## कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी आणि शहापूर येथे ९८ वा ' भारतीय कृषि अनुसंधान परिषद स्थापना (ICAR) दिवस' उत्साहात साजरा

"शेतकऱ्यांची प्रगती, देशाचा विकास!" हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून कृषी क्षेत्रात अविरत सेवा देणाऱ्या 'भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचा' (ICAR) ९८ वा स्थापना दिवस अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड -१ आणि मौजे शहापूर (ता. अर्धापूर) येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात ICAR गीताने करण्यात आली

या प्रसंगी परिसरातील शेतकरी, महिला आणि कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी येथे कृषि जैवतंत्रज्ञान विद्यार्थ्यां मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. देविकांत देशमुख (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, केव्हीके पोखर्णी) यांनी उपस्थित शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने देशातील कृषी विकासात आणि अन्नधान्य उत्पादनात ऐतिहासिक योगदान दिले आहे. बदलत्या हवामानात शाश्वत शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान, संतुलित खत वापर आणि मातीचे आरोग्य जपणे अत्यंत गरजेचे आहे."कार्यक्रमादरम्यान कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णीतील तज्ञांनी उपस्थितांशी थेट संवाद साधून मोलाचे मार्गदर्शन केले:

प्रा. माणिक कल्याणकर (पीक संरक्षण तज्ञ): पिकांवरील किडी व रोगांचे एकात्मिक नियंत्रण, जैविक कीटकनाशकांचा वापर आणि योग्य पीक संरक्षणाचे उपाय स्पष्ट केले.

डॉ. महेश आंबोरे (पशुवैद्यक तज्ञ): पशुपालन, दुग्ध व्यवसाय, जनावरांचे आरोग्य व्यवस्थापन व आहाराबाबत मार्गदर्शन केले.

प्रा. संदीप जायभाये (कृषी विद्यातज्ञ): जमिनीची सुपीकता, पिकांचे योग्य नियोजन आणि आधुनिक कृषी विद्या पद्धतींवर माहिती दिली.

सौ. अलका पवळे (गृह विज्ञान तज्ञ): महिलांसाठी कृषी पूरक व्यवसाय, पोषण मूल्य आणि अन्न प्रक्रिया उद्योगांविषयी सविस्तर चर्चा केली.

डॉ. अमिता क्षत्रिय (कृषी विस्तार तज्ञ) यांनी ICAR च्या ९८ वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा आढावा घेत कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडले.या संपूर्ण कार्यक्रमाची आखणी, सविस्तर प्रस्तावना आणि उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ.अमिता क्षत्रिय (कृषी विस्तार तज्ञ) यांनी केले. त्यांनी भारतीय कृषि अनुसंधान परिषद (ICAR) च्या स्थापनेमागचा उद्देश आणि केव्हीके पोखर्णीच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवल्या जाणाऱ्या विविध तंत्रज्ञानाची माहिती प्रास्ताविकातून मांडली. शहापूर व परिसरातील गावांमधील शेतकरी बंधू-भगिनी, महिला बचत गटाच्या सदस्या आणि कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून कृषी तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती घेतली.या कार्यकमासाठी कृषि विज्ञान केंद्राचे कर्मचारी श्री ए.जी भालेराव,श्री आर आर इंगोले,श्री आर.टी. वाडीले,श्री एस. एस. जाधव, सौ पी. एस. हाडोळतिकर, श्री एस.एस. गायकवाड, श्री एस.आर.कोणापुरे, श्री. दत्ता कदम,श्री आर.जी.राऊत आणि संतोष वाघमारे यांचे देखील हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विशेष सहकार्य लाभले.


भारतीय कृषि अनुसंधान परिषद
स्थापना दिवस
ICAR Foundation Day




ICAR Foundation Day

भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत
भारतीय कृषि अनुसंधान परिषद
स्थापना दिवस
सुस्वागतम

भारतीय कृषि अनुसंधान परिषद
स्थापना दिवस

भारतीय कृषि अनुसंधान परिषद


12:03
98th Foundation Day of ICAR
@icarindia 599 watching ...more
Description
98th Foundation Day of ICAR
N/A
568
16 Jul
Description
98th Foundation Day of ICAR
N/A
587
Likes
Viewers
16 Jul
2026
98th Foundation Day of ICAR
Video details
Description
98th Foundation Day of ICAR
Description
98th Foundation Day of ICAR
Description
98th Foundation Day of ICAR
N/A
Likes
568
Viewers
16 Jul
2026
98th Foundation Day of ICAR
Video details
Date
16 Jul 2026
Description
98th Foundation Day of ICAR
N/A
Likes
584
Viewers
16 Jul
2026
98th Foundation Day of ICAR
Devikant Deshmukh